प्रकरण पाचवे

# राष्ट्रीय सेवा योजनेतील

# नियमित कार्यक्रम व ग्रामीण विकास

प्रकरण पाचवे

# राष्ट्रीय सेवा योजनेतील नियमित कार्यक्रम व ग्रामीण विकास

५.१ प्रस्तावना

५.२ नियमित कार्यक्रमाचे स्वरूप

५.३ नियमित कार्यक्रमातील विविध उपक्रम

५.४ नियमित कार्यक्रमांची उद्दिष्टे

५.५ नियमित कार्यक्रम व ग्रामीण विकास

प्रकरण पाचवे

# राष्ट्रीय सेवा योजनेतील नियमित कार्यक्रम व ग्रामीण विकास

## ५.१ प्रस्तावना :

राष्ट्रीय सेवा योजना ही युवा कल्याण व खेळ मंत्रालय, केंद्र शासनाच्या वतीने विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवर सामाजिक समस्येची उकल सक्षमपणे सोडवणारी ही योजना आहे. कोणत्याही ठिकाणी घडलेल्या बिकट समस्यांच्या परिस्थितीवर तोडगा काढून लगेच कार्यवाही करणारी ही योजना नेहमीच यशस्वी राहिलेली आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच नियमित कार्यक्रम हे वर्षभर राबविले जातात. विशेषता महापुरुषांच्या जयंती- पुण्यतिथी कार्यक्रम, परिसर स्वच्छता, दिन विशेष इत्यादी कार्यक्रम राबविले जातात. महाविद्यालयात पुस्तकी ज्ञानाचे धडे घेत विद्यार्थी नियमित कार्यक्रम व उपक्रमाद्वारे समाजाशी संवाद साधने, सामाजिक प्रबोधन करणे, ग्रामीण भागातील विविध समस्या सोडविणे इत्यादी कार्य करत असतात. 'महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वर्षभर नियमित कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमात प्रामुख्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती, सक्रीय सहभाग आणि शिस्तीचे पालन करीत चारित्र्य संवर्धनाचे युवा दर्शन त्याच्या वर्तणुकीतून व्हावे ही किमान अपेक्षा असते. विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून नाविन्याचा वेध हा नेहमीच घेणे आवश्यक आहे.'[१] नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविकास, सामाजिक तळमळ, नेतृत्व इत्यादी गोष्टी आत्मसात करता येतात.

विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेतल्या नंतर पहिल्या वर्षी नियमित कार्यक्रमात १२० तास काम करावे लागते तर दुसऱ्या वर्षी १२० तास व एक ७ दिवसीय शिबीर पूर्ण करावे लागते. युवकांना नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास व वाटचाल या विषयी सविस्तर विवेचन महाविद्यालयातील रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी करतात. १२० तासामध्ये प्रामुख्याने २० तास स्वयंसेवकाचे प्रबोधन करावयाचे असते. यात व्याख्याने व चर्चासत्र आयोजित केले जाते. ३० तास हे महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे, पावसाळ्यात गवत काढणे, बाग बनवणे बागेतील झाडांना आळे करणे व पाणी घालणे, वृक्षारोपण याबरोबरच जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत पल्स पोलिओ अभियान, आरोग्य तपासणी इत्यादी कार्य करावे लागते. तर उरलेले ७० तास हे दत्तक

घेतलेल्या खेडेगावातील स्वच्छता, आरोग्य शिबीर, रस्ता दुरुस्त करणे इत्यादी कार्य करावे लागते. हे कार्य विद्यार्थ्या कडून करवून घेण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, सामाजिक कार्याबद्दल त्यांच्या मनात आपुलकी निर्माण व्हावी, समाज सेवेबद्दल असणारी तळमळ विद्यार्थ्यात जागृत व्हावे ही आहे. विद्यार्थी नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजासाठी काम करताना एक अवश्य विचार त्याच्या मनात येतो तो म्हणजे 'माझ्या कुटुंबापासून समाजाला काही त्रास होऊ नये' तो हा विचारच करत नाही तर अंमलबजावणीच करतो. हे विचार करण्याची उर्मी राष्ट्रीय सेवा योजनेनी दिली आहे. याही पुढे जाऊन विद्यार्थी नियमित कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजाला संकटातून बाहेर काढतो, 'नैसर्गिक आपत्ती किंवा युद्धजन्य परिस्थितीतील संकटकाळी युवक बऱ्याच ठिकाणी धावून गेलेला आहे, त्याने त्या ठिकाणी आपल्या कर्तृत्वाचा ठसा ठळकपणे उमटविला आहे. मग तो भयाण दुष्काळ असो किंवा अखिल मानवाला हादरून सोडणारा भूकंप असो.'[२] राष्ट्रीय सेवा योजनेचा युवक कसल्याही आपत्तीला घाबरत नाही. आपतकालीन परिस्थितीत संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जाण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. 'देशाच्या प्रगतीसाठी व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांनी नेहमीच कंबर कसलेली आहे. भारत – पाक युध्द असो किंवा किल्लारी – गुजरातच्या भूकंप पीडितांचा प्रश्न असो राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी लक्षणीय कामगिरी बजावलेली आहे.'[३]

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांचे नियोजन करीत असतानाच समाजातील दुर्बल घटकाच्या समस्यांचा विचार केला जात असतो. याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पीडितांच्या अनेक समस्या सोडविलेल्या आहेत. ग्रामीण भागातील पिडीत लोकांचे प्रश्न समजावून घेऊन विद्यार्थ्यांनी त्या समस्या नाहीस्या केलेल्या आहेत. दत्तक घेतलेल्या गावात विविध कार्यक्रम यशस्वी करता येतात. नवनवीन कार्यक्रमाचे प्रयोग सुद्धा करता येतात. 'दत्तक घेतलेल्या खेड्यामध्ये सर्वशिक्षाअभियान, आरोग्य, आहार, स्वयंस्वच्छता, संडास बांधणे, गटार व कचऱ्याचे नियोजन, पाणीव्यवस्थापन, पडीक जमीन संवर्धन, अपारंपरिक उर्जास्त्रोत, महिला व मुलांचे आरोग्य, कुटुंबनियोजन, लिंगभेदजागृती, सामाजिक न्याय, बचतगट तयार करून उद्योजकता वाढविणे, ग्रामीण रस्ता दुरुस्ती, स्त्रीशिक्षणजागृती, आपत्ती व्यवस्थापन, शेती विषयक मार्गदर्शन, कृषीपर्यटन,

कृषीतंत्रज्ञान वापराचे मार्गदर्शन व आर्थिक सर्वेक्षण'[४] इत्यादींचा नियमित कार्यक्रमात समावेश असावा. या सर्व गोष्टी ग्रामीण विकासासाठी अगदी महत्त्वपूर्ण आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन केवळ कामच करत नसतो तर समाजात त्याची एक वेगळी प्रतिमा निर्माण करत इतरांना समाज सेवेची प्रेरणा देत असतो. याबरोबरच नियमित कार्यक्रमातून विद्यार्थ्यांवर अपेक्षित संस्कार सुद्धा होतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांनी कालानुरूप, प्रसंगानुसार व समाजहितासाठी नवनवीन आव्हानांना समोर जावून देशनिष्ठा व सामाजिक बांधिलकीची जाणीव देखील करून दिली आहे. समाज व्यसनाधीनतेच्या अधीन जावू नये यासाठी नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध प्रबोधन विषयक कार्यक्रम गावात व महाविद्यालयात सादर करण्यात येतात.

## ५.२ नियमित कार्यक्रमाचे स्वरूप :

### १) स्वच्छते विषयक कार्यक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेतील नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता, बाग तयार करणे, बागेतील झाडांना आळे करणे व झाडांना पाणी देण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक करत असतात. दत्तक घेतलेल्या गावात किंवा झोपडपट्टीत जाऊन स्वच्छते विषयक काम केले जाते.

### २) बौद्धिक कार्यक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेतील नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून बौद्धिक कार्यक्रमाअंतर्गत वेगवेगळे सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक विषयावर परिसंवाद आयोजित केले जातात. बौद्धिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भारतीय राजघटनेतील मानवता, देश प्रेम, एखादी घडलेली सामाजिक समस्या इत्यादी विषयावर विद्यार्थ्यात हा विषय चर्चे साठी ठेवले जाते, या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास व अभ्यासू वृत्ती निर्माण होते. नियमित कार्यक्रमातून बौद्धिक विचारांचा प्रसार व्हावा. न्युनगंड, राग, व्देष, लोभ इ. दुर्गुणाचे उच्चाटनही झाले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेतील बौद्धिक कार्यक्रम हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी व दत्तक घेतलेल्या गावातील नागरिकांच्या प्रबोधनासाठी असते.

### ३) सामाजिक जनजागृतीपर कार्यक्रम :

नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक जनजागृती केली जाते. आपल्या महाविद्यालयाच्या क्षेत्रात एखादी वाईट प्रथा रूढी प्रथा असेल त्याच्या विरोधात जागृत फेरी काढली जाते. याबरोबरच भ्रष्टाचार, रोगराई, जातीभेद, रंगभेद, वर्णभेद, भाषाभेद इत्यादी समस्यांवर जागृतीपर कार्यक्रम आयोजित केली जातात. 'राष्ट्रीय सेवा योजनेचा युवक आपल्या जागरूकतेमुळे संपूर्ण समाजाला धोक्याचा इशारा देऊन त्यास वाचवू शकतो. एड्स सारख्या भयानक रोगा बदलची माहिती व घ्यावयाची खबरदारी याचं शास्त्रशुद्ध ज्ञान नागरिकांना दिल्यास त्यांना ते तर फायद्याचे ठरते तथापी भविष्याच्या दृष्टीने ही खबरदारीने नेमके कसे वागावे या बद्दलचेही ज्ञान मिळते.'[५]

**४) राष्ट्रीय कार्यक्रम :**

केंद्र शासन व राज्यशासन समाजाच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्या उपक्रमांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळते. अशा कार्यक्रमामध्ये युवकांनी कार्यक्रम अधिकाऱ्यांना सहकार्य करणे म्हणजेच देश सेवा होय. प्लस पोलिओ लसीकरण मोहीम व कुष्टरोग निर्मुलन मोहीम इत्यादी कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवकांनी भरीव मद्दत केलेली आहे. 'राष्ट्रीय सेवा योजना ही एक अत्यंत प्रभावशाली योजना आहे. कारण महाविद्यालयीन स्वयंसेवक पल्स पोलिओ उपक्रमामध्ये शासकीय उपक्रमामधील कर्मचारी यांच्या बरोबरीने प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचवू शकतात.'[६]

## ५.३ नियमित कार्यक्रमातील विविध उपक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमातून विविध नवनवीन उपक्रम राबविले जातात.

### १) आरोग्य विषयक उपक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमातून विद्यार्थी आरोग्य विषयक जनजागृती करीत असतात. 'राष्ट्रीय सेवा योजने मार्फत आरोग्यशिबिरे यात आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, मुली / महिला आरोग्य तपासणी, वृद्धांची आरोग्य तपासणी हिमोग्लोबिन – तपासणी अशी शिबिरे भरवून स्वयंसेवक ग्रामस्थांची आरोग्यतपासणी करू शकतो.'[७] समाज व समाजाचे आरोग्य हा ग्रामीण विकासातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. आज समाजात अनेक रोग पसरत आहेत यात एड्स, स्वाईन फ्ल्यू, मलेरिया, डेंग्यु, चिकन गुनिया, कावीळ, कॉलरा इत्यादी रोगांना आळा घालण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची जनजागृती व विविध शिबिरापासून अनेक प्रकारच्या रोगांना आटोक्यात आणता येऊ शकेल.

### २) पर्यावरण संरक्षण व संवर्धन :

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही आज काळाची गरज बनली आहे. पर्यावरणातील बिघाडामुळे आज अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी प्रयत्न करत आहेत.

### ३) महिला सक्षमीकरण :

ग्रामीण भागातील महिला आज पण थोड्या फार प्रमाणात उपेक्षित जीवन जगताना दिसून येत आहेत. त्यांच्या काही प्रश्नानाची सोडवणूक झालेली आहे मात्र लोकांच्या मानसिकतेत बदल झालेला दिसून येत नाही. ग्रामीण भागात हुंडाबळी, स्त्रियांना दुय्यम स्थान, निरक्षरता इत्यादी बाबतीतले दृश आज ही ग्रामीण भागात पहावयास मिळतात. या समस्यांचा नाय नाट करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतलेला आहे. महिलांना शिक्षणाचे महत्त्व व महिलांना धैर्य व निर्णय क्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण व जागृत फेरीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी करत असतात. याबरोबरच महिलांच्या कर्तव्याबाबत व्याख्याने आयोजित केली जातात.

### ४) सामाजिक कार्यक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवक युवतींना सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी, समाजाच्या विकासासाठी युवकांनी पुढाकार घेऊन सामाजिक कार्यक्रमातून राष्ट्र सेवा करावी ही या योजनेमागची भूमिका आहे. अपंग, अंध, मनोरुग्ण, अनाथ, वृद्धाश्रम, एड्सग्रस्त व कुष्ठरोगी इत्यादी प्रकारच्या संस्थांत जावून राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सेवा देत असतात.

### ५) शैक्षणिक कार्यक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत साक्षरतेचे महत्त्व समाजाला पटवून देत असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी दत्तक घेतलेल्या गावात जाऊन शैक्षणिक सर्वेक्षण करत असतात. ग्रामीण भागातील काही मुले शिक्षणापासून वंचित आहेत अशा मुलांच्या पालकांशी चर्चा करून त्यांच्या पाल्याला शाळेत जाण्यास प्रवृत्त करत असतात.

### ६) स्वच्छते विषयक कार्यक्रम :

महाविद्यालयाचा परिसर असो अथवा दत्तक घेतलेले गाव असो राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वच्छतेच्या दृष्टीने खूपच जागरूक असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वच्छते विषयक काम करताना घाणीचा किळस कधीच येऊ दिलेला नाही. ग्रामीण भागात स्वछतेविषयक काम करताना लोकांना विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचा गावकऱ्यांना हेवा वाटतो. इतकी मोठी शिकवण राष्ट्रीय सेवा योजनेंनी दिलेली आहे.

### ७) श्रमदान :

श्रमदान हे राष्ट्रीय सेवा योजनेचा अविभाज्य घटक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमात श्रमदानाला अतिशय महत्त्व आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी नियमित कार्यक्रमाच्या माध्यमातून दत्तक गावात जावून संडास चे खड्डे खोदणे, रस्ता दुरुस्ती व रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे इत्यादी श्रमदान विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करत असतात.

८) **आपत्ती व्यवस्थापन :**

समाज ज्या ज्या वेळी संकटात सापडतो त्या त्या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मदतीसाठी धावून जातात मग आपत्ती असो अथवा संकट असो. आपत्तीग्रस्तांना योग्य वेळी मदत मिळावी म्हणून प्रत्येक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात आपत्ती व्यवस्थापन कक्षाची सुरुवात करण्यात आली आहे. स्वयंसेवकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता आपत्ती ग्रस्तांना मदत करत असतात.

९) **रक्तदान शिबीर :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमाच्या माध्यमातून महापुरुष्याच्या जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. रक्तदान शिबिराचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे भूकंप, बॉम्बस्फोट इत्यादी संकटाच्या वेळी जखमींना रक्ताची आवश्यकता भासते तेव्हा रुग्णालयात रक्त उपलब्ध असतेच असे नाही त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात.

१०) **दिन विशेष उपक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या संबंधित काही महत्त्वाचे दिवस आहेत त्या दिवसी नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय युवा दिवस – १२ जानेवारी, जागतिक महिला दिन – ८ मार्च, राष्ट्रीय सेवा योजना दिन – २४ सप्टेंबर, गांधी जयंती – २ ऑक्टोंबर, राष्ट्रीय एकात्मता दिन – ३१ ऑक्टोंबर, आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन – ५ डिसेंबर इत्यादी महत्त्वपूर्ण दिनाच्या माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते व त्यादिवासाचे महत्त्व विषद केले जाते.

११) **अंधश्रद्धानिर्मुलन :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून अंधश्रद्धानिर्मुलना विषयी जनजागृती, अंधश्रद्धेचे विविध प्रयोग दाखवण्यात आले आहेत. आज अंधश्रद्धेमुळे समाज काहीही करू लागला आहे, यामुळे समाजाची पायमल्ली होतांना दिसून येत आहे. अंधश्रद्धेला कोणता शास्त्रीय आधार नाही तर 'अंधश्रद्धा ही गैरसमजातून व अज्ञानातून बळावते. जनमानसावर प्रभाव पडणाऱ्या

चुकीच्या, असत्य गोष्टीचे निर्मुलन करणे या हेतूने अंनिसच्या बरोबरीने राष्ट्रीय सेवा योजना ही महाराष्ट्रभर कार्य करते.'[८]

## ५.४ नियमित कार्यक्रमांची उद्दिष्टे :

राष्ट्रीय सेवा योजनेतील नियमित कार्यक्रम हे युवकांना समाजाबद्दल आत्मीयता निर्माण व्हावी यासाठी असतात. नियमित कार्यक्रमातूनच युवक व समाज यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण होत असतात. नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून अनेक महत्त्वपूर्ण कामे केली जात असतात. त्याचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे समाजाविषयी असणारी तळमळ होय.

१) युवकात नेतृत्व गुणांचा विकास व व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

२) समाजातील आरोग्याच्या समस्या दूर करून रोगावर उपाय सुचविणे.

३) दत्तक घेतलेल्या गावातील शाळेची स्वच्छता ठेवणे.

४) ग्रामीण भागात स्वच्छता अभियान राबविणे.

५) सामाजिक समस्या विषयी जनजागृती करणे.

६) व्यसनमुक्ती व एड्स विरोधी जनजागृती करणे.

७) महिला सबलीकरणासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

८) आपत्तीग्रस्तांनाना मदत करणे.

९) पर्यावरण स्वच्छ राखण्यास मदत करणे.

१०) वृक्षारोपण व संगोपन करणे.

११) आरोग्य विषयक शिबिरात मदत करणे.

१२) हागणदारी मुक्तीसाठी प्रयत्न करणे.

## ५.५ नियमित कार्यक्रम व ग्रामीण विकास :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून दत्तक घेतलेल्या गावाचा सर्वांगीण विकास करण्याची नैतिक जबाबदारी घेतली जाते. दत्तक घेतलेल्या गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे युनीट मार्फत ग्रामीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जात असतात. नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेनी लोकसहभागाबरोबरच शासनाचा ही सहभाग घेतलेला आहे. नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण विकास करणे म्हणजे गाव विकासाच्या संदर्भात लोकांच्या मनात आस्था निर्माण करून गाव विकासात सातत्य ठेवणे होय.

### १) पडीक जमीन संवर्धन :

पडीक जमीन संवर्धनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. ज्या ठिकाणी पडीक जमीन आहे त्या ठिकांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शेततळ्याची निर्मिती केलेली आहे. आज पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. बऱ्याच गावात उन्हाळ्यात प्यायला पाणी मिळत नाही. पाण्यासाठी भटकंती करावी लागते. उन्हाळ्यातही मुबलक पाणी मिळण्यासाठी प्रत्येक गावात शेततळ्याची निर्मिती करणे गरजेचे आहे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेनी ग्रामीण भागात शेततळ्याची निर्मिती केल्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे. पडीक जमिनीचा वापर विधायक कार्यासाठी होऊ लागला.

### २) पाणलोट क्षेत्र विकास :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्र विकासासाठी विद्यार्थ्यांनी खूप सहकार्य केलेले आहे. पावसाचे पाणी माळरानावरून वाहून जावू नये, यासाठी छोटे मोठे बांध राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी बांधलेले आहेत. यामुळे पाणी जमिनीत मुरल्यामुळे बारा महिने पाण्याची दुर्मिळता भासत नाही.

### ३) जनजागृती अभियान :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांचे प्रबोधन व्हावे यासाठी विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी चे आयोजन केले जात असते. जनजागृती संदर्भातील

विविध अभियान राबविले जातात त्यात ग्रामीण विकासाची योजना, नागरिकांच्या योजना, आरोग्य व अंधश्रद्धा इत्यादी विषयासंदर्भात जनजागृती करून मार्गदर्शन केले जात असते.

**४) महिला बचतगट :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी बचत गटाविषयी महिलांना माहिती दिली याबरोबरच बचत गटावर व्याख्याने आयोजित करण्यात आले. या मुळे ग्रामीण भागातील महिलांना बचत गटाचे महत्त्व लक्षात आले. ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय करू लागल्या याबरोबरच स्वावलंबी पण झाल्या. 'बचतगटांमुळे स्त्रियांना आत्मभान aआले, की ही काहीतरी करू शकते. या जाणिवांपर्यंत स्त्रिया येऊन पोहचल्या. समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन ही बदलला; कारण वर्षानुवर्ष त्याच कोंडवाड्यांत वावरणाऱ्या गृहिणी, बाई, सुगरण या विशेषणांना तडा जाऊन त्यांना स्वतःच्या आत्मभानाची खरी ओळख बचत गटांमुळे झाली.'[९]

**५) ग्रामीण रस्ता दुरुस्ती :**

ग्रामीण भागात आज ही ग्रामपंचायती मार्फत गावातील रस्त्याची दुरुस्ती व साफ सफाई केली जात नाही. गावातील लोकांनी ही तेवढ्या गांभीर्याने विचार करत नाहीत. स्वतः ही पुढे होऊन कार्य करत नाहीत. परंतु राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गावातील रस्त्याची साफ सफाई व रस्त्याची दुरुस्ती करतात, तेंव्हा गावकऱ्यांच ही सहकार्य मिळत असते.

**६) ग्रामीण भागातील आरोग्य :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमातून घेतली जाणारी आरोग्य विषयक शिबिरे राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने अगदी महत्त्वपूर्ण आहेत. स्वच्छतेच्या अभावामुळेच अनेक प्रकारच्या रोगांची लागण होऊ शकते यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सर्वप्रथम स्वच्छतेला महत्त्व देतात. याबरोबरच वेळो वेळी आरोग्य विषयक शिबिरे सुद्धा भरवली जात असतात.

**७) गावातील स्वच्छता :**

महाविद्यालयाच्या परिसराची व ग्रामीण भागातील स्वच्छतेच्या संदर्भात राष्ट्रीय सेवा योजनेंनी अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका निभावलेली आहे. स्वच्छतेच्या अभावामुळेच ग्रामीण भागातील लोकांना

रोगराईशी सामना करावा लागत आहे. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील नाल्या दुरुस्ती, रस्त्यावरची घाण, तुंबलेले गटारी, कचऱ्याची ढिगारे, रस्ता झाडून काढणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली आहेत.

**८) शेती विषयक मार्गदर्शन :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या हिताचे कृषी तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जात असतात. याबरोबरच आधुनिक शेती विषयी विविध कार्यक्रम देखील सादर केली जात असतात. यामुळे शेतकरी पारंपारिक शेती पद्धती सोडून आधुनिक शेती व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करतो. आधुनिक शेती व नवीन तंत्रज्ञान वापरल्यामुळे निश्चितच शेतीच्या उत्पन्नात वाढ होते.

**९) हागणदारी मुक्त गाव :**

आज भारतात प्रत्येक ५ व्यक्ती पैकी ४ व्यक्ती उघड्यावर शौचास बसतात. ही खूप मोठी शोकांतिका आहे. समाजाच्या आरोग्यास अपायकारक आहे. ग्रामीण भागात उघड्यावर शौचास बसल्याच्या परिणामांची माहिती नसल्यामुळे व 'शौचालयाची पुरेशी सुविधा नसल्याने लोक रस्त्याच्या कडेला शौचास बसतात; त्यामुळे गावाभोवती विष्ठा वर्षानुवर्ष साठते. दररोज कुजणाऱ्या या विष्ठेमधील घातक वायू बाहेर पडतात. व ते गावात पसरतात त्यामुळे त्याचा मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होतो.'[१०] यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जनजागृती करून त्याचे दुष्परिणाम लोकांना सांगितले जातात. याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात शौचालये सुद्धा बांधून दिली आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) फुलवाड्कर, दिनानाथ, *नाविन्यपूर्ण उपक्रम*, मोटे, नागनाथ (संपा), *राष्ट्रीय सेवा योजना*, श्रमतीर्थ द्विवार्षिकांक (१९९७-९९), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.११

२) कित्ता पृ.क्र.११

३) फुलवाडकर, दिनानाथ, *राष्ट्रीय सेवा योजना आणि जलसंवर्धन*, अंबेकर बाळासाहेब (संपा), *राष्ट्रीय सेवा योजना*, श्रमतीर्थ द्विवार्षिकांक, (२००१-२००३), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.२२

४) चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद (२०१०): *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे पृ.क्र.२८

५) उपरोक्त, *राष्ट्रीय सेवा योजना*, श्रमतीर्थ द्विवार्षिकांक (१९९७-९९) पृ.क्र.१२

६) कित्ता पृ.क्र.१००

७) उपरोक्त, चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद, *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना*, पृ.क्र.९९

८) कित्ता पृ.क्र.१२३

९) कित्ता पृ.क्र.१३४

१०) कित्ता पृ.क्र.९५